MHKO160008112021

नियमित दिवाणी दावा क्र. ११२/२०२१, निशानी क्र २८

०१. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज आणि सोबतचे प्रतिज्ञापत्र दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश ६ नियम १७ अन्वये वादपत्रमध्ये दुरूस्ती करण्यास परवानगी मिळण्यासाठी आणि आदेश ९ नियम १० अन्वये आवश्यक पक्षकार सामील होवून मिळण्यासाठी दाखल केला आहे.

०२. वादी यांनी प्रस्तुतचा दावा खरेदीदस्तातील चूक दुरूस्त होऊन मिळणे आणि निरंतर मनाईसाठी दाखल केला आहे. वादी यांनी दाव्यामध्ये प्रतिवादी १ ते ४ हे दावा मिळकतीमध्ये बांधकाम करीत आहेत असे कथन केले आहे. प्रतिवादी यांनी १ ते ४ यांनी निशानी २४ येथे कैफियत आणि म्हणणे दिलेले आहे. प्रतिवादी १ ते ४ यांनी कैफियतीमध्ये दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी नं २ व ३ यांच्या पत्नी अनुक्रमे सौ. अरूणा संजय पाटील, लक्ष्मी उत्तम शिंदे हे बांधकाम करीत आहेत असे कथन केले आहे. वादी यांना दावा मिळकतीमध्ये सौ. अरूणा पाटील व सौ. लक्ष्मी शिंदे या बांधकाम करीत आहेत याची माहिती प्रतिवादी १ ते ४ यांनी कैफियत दाखल केल्यानंतर समजली आहे. त्यामुळे वादी हे सौ. अरूणा पाटील व सौ. लक्ष्मी शिंदे यांना दाव्यामध्ये आवश्यक पक्षकार म्हणून सामील करू इच्छीत आहेत आणि वादपत्रामध्ये त्या अनुशंगाने आवश्यक त्या ठिकाणी दुरूस्ती करू इच्छीत आहेत. प्रस्तुतचा दावा गुणदोषावर निकाली होण्यासाठी अर्जामध्ये नमूद केलेली दुरूस्ती वादपत्रामध्ये करणे अत्यंत आवश्यक आहे आणि प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही असे वादी यांनी कथन केले आहे. वादी यांनी वर नमूद कारणांवरून प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात यावा आणि अर्जामध्ये नमूद दुरूस्ती वादपत्रामध्ये करण्यास परवानगी देण्यात यावी अशी विनंती केली आहे.

०३. प्रतिवादी १ ते ४ यांनी प्रस्तुत अर्जास म्हणणे नि.२९ येथे दिलेले आहे. प्रतिवादी १ ते ४ यांनी त्यांचे म्हणण्यामध्ये अर्जातील मजकूर नाकारला आहे. प्रतिवादी १ ते ४ यांचे कथनानुसार त्यांनी कैफियत दाखल करून सत्य वस्तुस्थिती न्यायालयासमोर आणली आहे, प्रतिवादी १ ते ४ यांचा बचाव नष्ट करण्यासाठी वादी

यांनी हा खोटा, चुकीचा अर्ज दाखल केला आहे. प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादी १ ते ४ यांचा बचाव नष्ट होणार आहे. दावा नि.५ वरील अर्जाचे चौकशीसाठी प्रलंबित आहे, वादी यांनी नि.५ वरील अर्जाची चौकशी यास विलंब व्हावा याकरीता हा अर्ज दाखल केला आहे. प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास दाव्याचे मूळ स्वरूप बदलणार आहे. वादी यांचे प्रस्तुत अर्जातील मजकूर खोटा आणि चुकीचा आहे. प्रतिवादी १ ते ४ यांची प्रस्तुत अर्ज मंजूर करण्यास सक्त हरकत आहे. प्रतिवादी १ ते ४ यांनी वर नमूद कारणांवरून अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०४. मी वादी व प्रतिवादी १ ते ४ यांचे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला, अभिलेखावरील कागदपत्रे, वादी आणि प्रतिवादी १ ते ४ यांचे वादपत्र यांचे अवलोकन केले आहे. वादी यांचे अर्जातील कथन आणि वादपत्र पाहिले असता हे प्रथमदर्शनी स्पष्ट होत आहे की, दावा दाखल करतेसमयी सौ. अरूणा पाटील व सौ. लक्ष्मी शिंदे या दावा मिळकतीमध्ये बांधकाम करीत आहेत हे माहिती नसल्यामुळे त्यांना दाव्याचे कामी आवश्यक पक्षकार म्हणून सामील केलेले नाही. प्रतिवादी १ ते ४ यांनी कैफियतीमध्ये दावा मिळकतीमध्ये सौ. अरूण पाटील व सौ. लक्ष्मी शिंदे हे बांधकाम करीत आहेत असे कथन केले आहे. वादी यांचे असे वादपत्र आहे की, ते संपूर्ण दावा मिळकतीचे मालक आणि कब्जेदार आहेत आणि प्रतिवादी १ ते ४ हे दावा मिळकतीमध्ये बांधकाम करीत आहेत. वर नमूद चर्चेमधून सौ. अरूणा पाटील व सौ. लक्ष्मी शिंदे या दावा मिळकतीमध्ये बांधकाम करीत आहेत ही घटना अभिलेखावर येत आहे, त्यामुळे प्रस्तुतची दुरूस्ती ही वादी आणि प्रतिवादी १ ते ४ यांचेदरम्यानचा मुख्य वाद निकाली करण्यासाठी अत्यंत आवश्यक असल्याचे स्पष्ट होत आहे. तसेच, सौ. अरूणा पाटील व सौ. लक्ष्मी शिंदे या दाव्याचे कामी आवश्यक पक्षकार असल्याचेदेखिल स्पष्ट होत आहे. प्रतिवादी १ ते ४ यांच्या हरकतीचा विचार करता प्रस्तुतचा अर्ज मंजूर झाल्यानंतर त्यांना जादा कैफियत देऊन बचाव घेण्याची संधी उपलब्ध आहे. परिणामी, प्राप्त परिस्थितीमध्ये प्रतिवादी नं १ ते ४ यांची हरकत नाकारण्यात येत आहे. सबब, वर नमूद कारणांवरून वादी यांची अर्जातील विनंती मान्य करण्यास पात्र आहे असे स्पष्ट होत आहे. सबब, वर नमूद निष्कर्षास अनुसरून मी खालील आदेश करीत आहे.

आदेश

०१ अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

०२. वादी यांना वादपत्रामध्ये दुरूस्ती करण्यास परवानगी देण्यात येत आहे आणि वादी यांनी अर्जामध्ये नमूद दुरूस्ती १४ दिवसांचे आत करावी आणि दुरूस्त दावा प्रत न्यायातयात दाखल करावी.

सही/-

दिनांक १३/१२/२०२१

( एच आर पाटील )
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
मलकापूर-शाहूवाडी